# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २७ । अंक १४ । शनिवार, दि. ७ डिसेंबर २०२४ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## देसाईंचा राऊतांवर निशाणा

**मुंबई ।** उद्धव ठाकरे गटातील अनेक आमदार संजय राऊत यांच्याबद्दल खाजगीमध्ये काही सांगतात. त्यांच्या वागण्यामुळे ही वेळ आली आहे. हा संजय राऊत यांना सावधगिरीची इशारा आहे. नाहीतरी आता उद्धव ठाकरे गट शिल्लकच राहिलेला नाही. २०१९ च्या निकालानंतर आमदारांची बैठक घेऊन बोट दाखवत तुमच्यापैकी मुख्यमंत्री करणार असं बोलते होते. पण नंतर ते बोट स्वत:कडे फिरले आणि ते मुख्यमंत्री झाले. तेव्हा मुख्यमंत्री करायला शिवसैनिक दिसला नाही, या शब्दांत शंभुराज देसाई यांनी निशाणा साधला.

## ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचे निधन



**अहिल्यादेवी नगर ।** भाजपचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचे निधन झाले आहे. ते ८४ वर्षांचे होते. नाशिक येथील ९ प्लस रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मग भाजप असा त्यांचा प्रवास होता. १९८० ते २०१४ या काळात त्यांनी अकोले विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून काम केले. १९९५ ते १९९९ या काळात ते विधानसभेत विरोधीपक्ष नेते होते. मधुकर पिचड यांनी १९६१ साली अकोले येथे अमृतसागर दूध सहकारी संस्थेची स्थापना केली. तर अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे ते संस्थापक अध्यक्ष होते.

## संपादकीय

### चौकटीबाहेरचे प्रयत्न

सरकारी व्यवस्था अनेकवेळा जनता आणि प्रसार माध्यमांच्या टीकेची धनी होते. याचबरोबर अनेक सामाजिक संस्था प्रशासकीय यंत्रणेतील उणिवा आणि गैरप्रकार धसास लावण्याचा प्रयत्न करतात. सरकारी सेवकांची काम करण्याची मानसिकता हा त्यातील प्रमुख मुद्दा असतो. या सगळ्या खटाटोपामागे जनतेचे भले व्हावे, हाच उद्देश असतो. विशेषत: आरोग्य यंत्रणेचा समाचार वारंवार घेतला जातो. कदाचित लोकांची ती दैनंदिन गरज बनली असावी. कारण घरातील कोणत्या ना कोणत्या सदस्याचे आरोग्य ऋतुमानानुसार बिघडू शकते. समाजाच्या फार मोठ्या हिश्श्याला सरकारी आरोग्य व्यवस्थेचाच आधार असतो. त्यामुळेच या व्यवस्थेकडे संबंधितांचे लक्ष जात असावे. तथापि यंत्रणेच्या बलाढ्य चौकटीतसुद्धा अनेक अधिकारी चौकटीबाहेरचा दृष्टिकोन बाळगताना दिसतात. 'सरकारी काम अन सहा महिने थांब' हा टीकात्मक ठसा धूसर करण्याचे काम त्यांच्यापरीने करतात. बीड परिसरात ऊसतोड कामगारांची वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. सकाळी ऊसतोडणीला जाऊन रात्री उशिरा परतणे ही त्यांची दिनचर्या! गरज आणि इच्छा असूनही त्यांना सरकारी आरोग्यसेवेचा लाभ घेणे अशक्य होत असेल. ही उणीव बीड जिल्हा रुग्णालयासह इतर काही उपकेंद्रांच्या डॉक्टरांनी दूर केली. डॉक्टरांचे एक पथक रात्री उशिरा त्यांच्या वस्तीवर पोहोचले. त्यांनी गरजूंवर उपचार केले. मोबाईलच्या उजेडात आरोग्यसेवा दिल्याची माहिती वृत्तपत्रांतील बातमीत आहे. डॉक्टर पथकाच्या भेटीत सात गरोदर माता आणि त्यापैकी दोघी जोखमीच्या अवस्थेत होत्या. त्यांच्यावर पुढील उपचार सुरु झाल्याचे त्यात म्हटले आहे. अलिबाग परिसरात अनेक बालके कुपोषित जन्माला येतात. अशा सुमारे ७०० पेक्षा जास्त बालकांचे कुपोषण कमी करण्यात अलिबाग जिल्हा रुग्णालयाला यश आले आहे. रुग्णालयात यासाठी विशेष कक्ष कार्यरत आहे. डॉक्टर आणि आरोग्य सेवकांच्या पथकाने याकामी विशेष प्रयत्न केले. सरकारी आरोग्यसेवेत पान २ वर

# हमीभावानेच खरेदी

## केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे लोकसभेत आश्वासन



**नवी दिल्ली ।** मोदी सरकार सर्व शेतमालाची खरेदी किमान आधारभूत किंमतीवर करेल, असे केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे. दरम्यान सरकारच्या या घोषणेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

चौहान यांनी शुक्रवारी राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान किमान आधारभूत किंमत (एमएसपी) या विषयावरील पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना शेतकरी बांधवांना हे आश्वासन दिले आहे. महत्वाचे म्हणजे, शेतकरी आपल्या मागण्या घेऊन दिल्लीच्या दिशेने जाण्याचा प्लॅन करत असतानाच, शिवराज सिंह यांनी हे आश्वासन दिले आहे. सभागृहात माहिती देताना चौहान म्हणाले, मला तुमच्या (अध्यक्ष) मार्फत सभागृहाला आश्वासन द्यायचे आहे की, शेतकऱ्यांच्या सर्व शेतमालाची किमान आधारभूत किंमतीवर खरेदी केली जाईल. हे मोदी सरकार आहे आणि मोदींची गॅरंटी पूर्ण करण्याची गॅरंटी आहे.

### दस्तऐवज सभागृहाच्या पटलावर

चौहान म्हणाले, दुसऱ्या बाजूला आमचे मित्र जेव्हा सत्तेत होते, तेव्हा त्यांनी रेकॉर्डवर सांगितले होते की, आम्ही एम.एस. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारू शकत नाहीत. विशेषत: उत्पादनाच्या खर्चापेक्षा ५० टक्के अधिक देण्याचा मुद्दा. माझ्याकडे रेकॉर्ड आहे. यावेळी त्यांनी, आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ माजी कृषी राज्यमंत्री कांतीलाल भुरिया, कृषिमंत्री शरद पवार आणि केव्ही थॉमस यांचा हवालाही दिला. चौहान यांच्या या विधानानंतर, वरिष्ठ सभागृहाचे अध्यक्ष जगदीप धनखर यांनी त्यांना त्यांच्या दाव्याच्या पुष्टीसाठी कागदपत्रे सादर करण्यास सांगितले. चौहान यांनीही, हे मान्य केले. एवढेच नाही तर, गत यूपीए सरकारने शेतकऱ्यांचा कधीही सन्मान केला नाही आणि कधीही शेतकऱ्यांच्या लाभदायक किंमतींच्या मागण्यांवर गांभीर्याने विचारही केला नाही, असा दावाही त्यांनी केला.

### ५० टक्क्यांपर्यंत मिळतोय लाभ

कृषिमंत्री पुढे म्हणाले, मी आपल्या माध्यमाने सभागृहाला आश्वास्त करू इच्छितो की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ पासून शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर ५० टक्के लाभ देऊन किमान आधारभूत किंमत मोजण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय, मोदी सरकार आधीपासूनच शेतकऱ्यांना लाभदायक भाव देत आहे, असा दावाही त्यांनी केला.

### शेतकऱ्यांची दिल्लीकडे कूच

गेल्या ९ महिन्यांपासून पंजाब-हरियाणा सीमेवर तळ ठोकून बसलेल्या शेतकऱ्यांचा अखेर दिल्लीकडे मोर्चा सुरू झाला आहे. १०१ शेतकऱ्यांनी पायी चालत अंबालाकडे जाताना २ बॅरिकेड्स ओलांडले. शेतकऱ्यांनी अडथळे आणि तारांचे कुंपण उखडून फेकले आहेत. एमएसपी, कर्जमाफी आणि पेन्शन यासारख्या मागण्यांसाठी १३ फेब्रुवारीपासून आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना हरियाणा सरकारने मोर्चाला परवानगी दिलेली नाही.

# देवेंद्र सरकारचा विकास प्लॅन तयार

## नदीजोड, ग्रीन एनर्जीवर भर

**मुंबई ।** जनतेने आम्हाला प्रचंड बहुमत दिले आहे. याचा मला आनंद आहे, त्याचबरोबर जबाबदारीची जाणीव देखील झाली. जनतेच्या आशा पूर्ण करण्यासाठी हे यश दिल असल्याचे वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महाराष्ट्र आता थांबणार नाही याचा अर्थ अडीच वर्षापूर्वी आमचे सरकार आले तेव्हा आम्ही राज्याला ट्रॅकवर आणले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले होते, तर मी आणि अजितदादा उपमुख्यमंत्री झाले होते. आता पुढच्या काळात प्रकल्पांना वेगाने पुढे नेणार आहोत. येत्या काळात माझा भर हा नदीजोड प्रकल्पावर असणार आहे. तर दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे ग्रीन एनर्जीवर भर असणार आहे, असे फडणवीस म्हणाले.

**अर्थव्यवस्थेला चालना मिळणार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वाहिनीला विशेष मुलाखत दिली. यावेळी त्यांनी विविध मुद्दे मांडले. पुढच्या काळात नदीजोड चार नदीजोड प्रकल्पावार माझा भर असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. मी पान २ वर

### मी बेस्ट सीएमसाठी नाही

शिंदे नाराज होते, तुमच्यापेक्षा ते जास्त चांगले मुख्यमंत्री असल्याचं दाखवण्याचा प्रयत्न करत होते? याबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शिंदेंनी चांगले काम केले. अडीच वर्षात आम्ही सर्वांनी टीम म्हणून चांगले काम केले. माझे सहकारी जर लोकांच्या मनात जागा मिळवत असतील, तर मला त्याचा आनंद आहे. मी बेस्ट सीएमसाठी नाही, जनतेचे काम करण्यासाठी आलोय. पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, शिंदे उपमुख्यमंत्री बनू इच्छीत नव्हते, असं नाही. मी पण इच्छुक नव्हतो. मात्र, पक्ष चालवण्यासाठी ही गरज असते असेही ते म्हणाले.

## विधानसभेच्या हंगामी अध्यक्षपदी कोळंबकर



**मुंबई ।** विधिमंडळाच्या हंगामी अधिवेशनासाठी विधानसभा अध्यक्षांची निवड करण्यात आली आहे. भाजप नेते आणि ज्येष्ठ आमदार कालिदास कोळंबकर यांना विधानसभेचं हंगामी अध्यक्षपद देण्यात आले आहे. राजभवन येथे आज हंगामी अध्यक्षांचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. त्यामुळे, विधिमंडळाच्या विशेष अधिवेशन काळात त्यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभेचे कामकाज होणार आहे.

## अमळनेरात डोक्यात दगड टाकून तरुणाचा खून

### अनैतिक संबंधातून घटना : पत्नीसह प्रियकराला अटक

**अमळनेर ।** तालुक्यातील मंगरुळ येथील एमआयडीसी परिसरात तुषार चिंधू चौधरी (वय ३७, रा.मारवड, ता.अमळनेर, ह.मु.प्रताप मील, अमळनेर) या तरुणाचा मृतदेह शुक्रवारी दि.६ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता आढळल्याने खळबळ उडाली होती. दरम्यान ही घटना अनैतिक संबंधातून घडल्याचे उघडकीस आले असून मयताच्या पत्नीसह प्रियकराला अटक करण्यात आली आहे.



तुषार हा मूळचा मारवड (ता.अमळनेर) येथील रहिवासी असून तो अमळनेर येथे प्रताप मिल कंपाऊंडमध्ये राहत होता. तो शेत व प्लॉट विक्रीचा व्यवसाय करतो. दि.५ रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास तो आई रंजनाबाई व पूजा यांना 'दहा मिनिटात येतो', असे सांगून घराबाहेर पडला. रात्री उशिरापर्यंत तुषार घरी आला नाही. म्हणून त्याचा सर्वत्र शोध घेतला होता. त्याचे लोकेशन काढले असता ते मंगरुळपर्यंत दाखवत होते. मात्र तुषारचा पत्ता लागला नाही. सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास तुषार मंगरुळ येथे जखमी अवस्थेत पडला असल्याचे समजले.

तुषार याच्या कपाळावर डोक्यावर दगडाने वार केलेला होता. त्याच्या डाव्या कानाजवळ व डाव्या डोळ्याजवळ गंभीर जखमा होत्या. घटनास्थळी प्रभारी डीवाय.एस.पी. धनंजय वेरुळ, पोलीस निरीक्षक विकास देवरे, पोलीस उपनिरीक्षक युवराज बागुल, हेडकॉन्स्टेबल कैलास शिंदे, मिलिंद बोरसे, सागर पान २ वर

## गुलाबराव देवकर शरद पवारांची साथ सोडणार

### सुनील तटकरे यांची घेतली भेट

**जळगाव ।** जिल्ह्याचे माजी पालकमंत्री गुलाबराव देवकर यांनी शरद पवार यांची साथ सोडण्याचा निर्णय घेतला असून लवकरच ते अजितदादा यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. या वृत्ताला श्री.देवकर यांनी दुजोरा दिला आहे. विधानसभेत झालेल्या पराभवानंतर गुलाबराव देवकर यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दि.५ रोजी मुंबईत भेट घेतली. त्यानुसार त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच अजितदादा यांची भेट घेऊन पक्ष प्रवेशाचे निश्चित केले जाणार असल्याचे गुलाबराव देवकर यांनी 'देशदूत'शी बोलतांना सांगितले.



## विधिमंडळाचे आजपासून विशेष अधिवेशन

**मुंबई ।** पंधरावी विधानसभा गठीत होऊन नव्या महायुती सरकारचा शपथविधी झाल्यानंतर राज्य विधिमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन आज, शनिवारपासून सुरु होत आहे. या अधिवेशनात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या २८८ सदस्यांना शपथ दिली जाणार आहे. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर नवनिर्वाचित आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ देतील.

## शरद पवार उद्या मारकडवाडीत जाणार

### ईव्हीएम विरोधातील आंदोलकांशी साधणार संवाद



**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे रविवारी मारकडवाडी येथे येणार आहेत. सकाळी साडेनऊ वाजता शरद पवार हे हेलिकॉप्टरने मारकडवाडी येथे येणार आहेत. ईव्हीएम विरोधातील देशात मारकडवाडी हे पहिले गाव होते ज्याने बॅलेट पेपरवर मतदान घेण्यासाठी आंदोलन केले होते. याच ठिकाणी आता राहुल गांधींसह इंडिया आघाडीचे नेतेही लवकरच भेट देणार असून रविवारी शरद पवार पहिल्यांदा इथे पोहोचणार आहेत.

माळशिरसचे आमदार आणि या आंदोलनाचे नेते उत्तमराव जानकर यांचा शपथविधी देखील रविवारीच होणार होता. मात्र, त्यांनी आता अध्यक्षांची परवानगी घेऊन सोमवारी अध्यक्षांच्या दालनात शपथ घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी हे गाव राज्यभर चर्चेत आलं आहे. कारण या गावातील नागरिकांनी पान २ वर



मुंबई । महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिवादन केले. यावेळी राज्यपाल राधाकृष्णन् व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.

# ज्येष्ठतेच्या मुद्यावर मंत्रिपद मिळणार नाही!

## उपमुख्यमंत्री शिंदेंच्या निर्णयाने धाबे दणाणले



**मुंबई ।** फक्त ज्येष्ठतेच्या मुद्यावर मंत्रिपद दिलं जाणार नसल्यानं शिवसेनेतील बड्या नेत्यांचे धाबे दणाणले आहेत. या निकषाचा धक्का अनेकांना बसू शकतो. त्यामुळे भल्याभल्या नेत्यांनी याचा धसका घेतला आहे. गेल्या मंत्रिमंडळात शिवसेनेकडून गुलाबराव पाटील, संजय राठोड, उदय सामंत, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, दीपक केसरकर, शंभुराज देसाई, दादा भुसे यांची वर्णी लागली होती. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचा शपथविधी काल आझाद मैदानात संपन्न पान २ वर

### असे आहेत तीन निकष

शिंदेंनी केलेल्या बंडात सेनेच्या ४० आमदारांनी साथ दिली. तर विधानसभा निवडणुकीत सेनेचे एकूण ५७ उमेदवार विजयी झाले. यंदा मंत्रिपदं देताना शिंदे तीन कठोर निकष लावणार आहेत. पक्ष वाढवण्यात योगदान देणाऱ्यांचा विचार मंत्रिपदे देताना केला जाईल. निवडणूक प्रचारात आमदाराने किती साथ दिली, ही बाब मंत्रिपद देताना विचारात घेतली जाईल. तिसरा महत्त्वाचा निकष म्हणजे केवळ ज्येष्ठ आहे म्हणून मंत्रिपदं दिले जाणार नाही.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1550 |
| नवती (२) | : 1350 |
| पिलबाग | : --- |
| वापसी | : --- |

## मिरचीकी




# शेतकऱ्यांसाठी कृषी कर्जाची मर्यादा वाढविली

## गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्याकडून पतधोरण जाहीर

**नवी दिल्ली ।** भारतीय रिझर्व्ह बँकेनं मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कृषी कर्जाच्या मर्यादेत रिजर्व बँकेने वाढ केली आहे. विशेष म्हणजे हमीमुक्त कर्जाचा पुरवठा केला जाणार आहे. कृषी कर्जाची मर्यादा १ लाख ६० हजारांवरुन २ लाख रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची माहिती आरबीआयने दिली आहे. महागाई आणि शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत झालेली वाढ लक्षात घेता हमीमुक्त कृषी कर्जाची मर्यादा १ लाख ६० हजारांवरुन २ लाख रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आपल्या शेवटच्या पतधोरणात शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. वाढत्या महागाईपासून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आता हमीशिवाय २ लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्याची घोषणा केली आहे. सध्या ही मर्यादा १.६ लाख रुपये आहे.

### रेपो दरात बदल नाही

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) शुक्रवारी चालू आर्थिक वर्षाच्या पाचव्या पतधोरण बैठकीत सलग ११व्यांदा पतधोरणात कोणताही बदल केला नाही. तो ६.५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. मात्र, अर्थव्यवस्थेत रोख वाढवण्याच्या उद्देशाने मध्यवर्ती बँकेने सीआरआर (कॅश रिझर्व्ह रेशो) ४.५ टक्क्यांवरून चार टक्क्यांवर आणला. या पावलामुळे बँकांमध्ये १.१६ लाख कोटी रुपयांची अतिरिक्त रोकड उपलब्ध होणार आहे. सीआरआर अंतर्गत, व्यावसायिक बँकांना त्यांच्या ठेवींचा एक विशिष्ट भाग केंद्रीय बँकेकडे रोख राखीव म्हणून ठेवावा लागतो. यासोबतच सध्याची परिस्थिती पाहता आरबीआयने चालू आर्थिक वर्षासाठी आर्थिक विकास दराचा अंदाज ७.२ टक्क्यांवरून ६.६ टक्क्यांवर आणला आहे. आरबीआयने चालू आर्थिक वर्षातील किरकोळ महागाईचा अंदाज ४.५ टक्क्यांवरून ४.८ टक्के केला आहे.

## पिलीभीत येथे भीषण अपघातात ११ जण ठार

**पिलीभीत ।** उत्तरप्रदेशराज्यातील पिलीभीत येथे अपघाताच्या दोन भीषण घटना घडल्या असून या दोन्ही दुर्घटनेत एकूण ११ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी एका कारमधून वाहतूक करणाऱ्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने ती कार झाडावर आदळून भीषण अपघात झाला. त्यामध्ये, ५ जणांचा जागीच मृत्यू झाला तर ६ जण जखमी झाले आहेत. लग्न समारंभाहून परत येत असताना या कारचा अपघात झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत वधु हुसना हिचे वडिल मंजूर अहमद यांचाही जागीच मृत्यू झाला. लेकीचं लग्न लावून परत येत असताना ही ह्रदयद्रावक घटना घडली. कार हायस्पीडने जात असल्याने दुर्घटनेत कारचा चक्काचूर झाल्याचं पाहायला मिळालं.


पुण्यासह मुंबई व जळगाव येथील शाखेतही उद्या जळगावात पुण्याचे नाडीतज्ञ वैद्य प्रविण पाटील M.D.(Ayu), आयुर्वेद वाचस्पती, आयुर्वेदाचार्य, पुणे

जळगाव शाखा रविवार, दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी डॉ.उभाड पाटील मुलांचे व डोळ्यांचे हॉस्पिटल तेली समाज शॉपिंग कॉम्प्लेक्स, जळगाव | वेळ- स.१० ते संध्या ६

सर्व विकारांसाठी नाडी परिक्षनाने परिपूर्ण आयुर्वेदीय उपचार

- सुदृढ व निरोगी आपत्य प्राप्तीसाठी ● हृदयविकार (रक्त वाहिन्यांमधील ब्लॉकेज)
- पाठीच्या मणक्याच्या विकतीसृाठी ● स्त्रीयांचे/बालकांचे विकार
- गर्भसंस्कार ● त्वचारोग/सोरयसिस ● संधिवात/ आमवात ● स्थूलपणा वजन वाढविणे ● मधुमेह (डायबेटीस) ● किडनी फेल्युअर, मुतखडा
- जुनाट सर्दी/ दमा आम्लपित्त व पचनाच्या सर्व तक्रारी.
- (PCOD) मासिक पाळीच्या तक्रारी ● गर्भसंस्कार-गर्भाच्या उत्तमवाढीसाठी तसेच सदृढ व निरोगी संततीसाठी महिने ९ उपचार. ● उंची वाढविणे सल्ला

॥ श्री विश्व आयुर्वेदामृत ॥ आयुर्वेदाचार्य वैद्य प्रविण पाटील

आयुर्वेदीय पंचकर्म चिकित्सालय व संशोधन केंद्र, पुणे. For Appointment : 9423252791 / 9970266600

● पुणे मुख्य शाखा- सोम ते शनि ● जळगाव येथे २ऱ्या व ४थ्या रविवारी ● मुंबई येथे ३ऱ्या रविवारी

Ayurveda Cure with Care | WATCH संस्थेमार्फत जनहितार्थ